# सहसंचालक तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,

नागपूर विभाग शासकीय तंत्रनिकेतन परिसर, सदर, नागपूर

दुरध्वनी क्र. ०७१२–६४६५१४५/४६ फॅक्स क्र. ०७१२–२५६१६६३

E-mail : ronagpur.dte@gmail.com Website : www.rdtenagpur.org.in


**अतिमहत्वाचे**

**कालमर्यादेत**

क्र:–तंशिस/प्राकाना/शैवि/वृक्ष.लागवड/२०१४/1389

दिनांक :– 3 MAY 2014

प्रति,

प्राचार्य/संचालक,

सर्व शासकीय अशासकीय अनुदानित व विनाअनुदानित

अभियांत्रिकी, औषधनिर्माणशास्त्र, हॉटेल मॅनेजमेंट व वास्तुशास्त्र पदवी व पदविका संस्था,

सर्व एम.बी.ए., एस.सी.ए. संस्था नागपूर जिल्हा, नागपूर

विषय:– **सन २०१४ करीता शतकोटी वृक्ष लागवडीचे उदिष्ट साध्य करण्याबाबत**

संदर्भ:– मा.जिल्हाधिकारी यांचे पत्र क्र. म[redacted]ग्रारोहयो/वृक्ष लागवड उद्दिष्टे/कावि.६/२०१४, दि. १५/४/२०१४

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने मागील दोन वर्षीप्रमाणे या वर्षी सुध्दा शतकोटी वृक्ष लागवड कार्यक्रम २०१४ करीता या कार्यालयास संदर्भिय पत्रान्वये उद्दिष्ट ठरवून दिलेले आहे. मागील दोन वर्षी कार्यालयास ठरवून दिलेले उद्दिष्ट आपल्या सहकार्यामुळे आपण पुर्ण करु शकलो. त्याचप्रमाणे या वर्षी सुध्दा या कार्यालयास ठरवून दिलेले उद्दिष्ट पुर्ण करावयाचे आहे.

त्याकरीता उपरोक्त संदर्भिय पत्रान्वये वृक्ष लागवडीकरीता खड्डे खोदण्याचे काम दि. १५ मे २०१४ पुर्वी करावयाची. **त्यासाठी प्रत्येक महाविद्यालयास ३०० वृक्ष लागवडीचे उद्दिष्ट ठरवून देण्यात आले आहे**.

सदर उपक्रम यशस्वीरित्या पुर्ण करण्यासाठी मा. मुख्यमंत्री व मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य यांनी विशेष लक्ष घालून सदर उपक्रम यशस्वी करण्याबाबत आदेशित केले असल्याने सदर उपक्रम गांभिर्याने घेणे आवश्यक आहे. करीता आपण खालीलप्रमाणे सुचनांचे पालन करुन तसा अहवाल या कार्यालयास सादर करावा.

१. वृक्ष लागवड जुन–२०१४ च्या दुस–या आठवडयात करावयाची असल्यामुळे वृक्ष लागवड करण्याकरीता **खोदावयाचे खड्डे १५ मे, २०१४ पुर्वी खोदावे** जेणेकरुन खोदलेल्या मातीवर सुर्यप्रकाशामुळे प्रक्रीया होवून योग्य वेळी लागवड केलेली रोपे जोमाने वाढतील व मरअळ होणार नाही.

२. कोणत्याही परिस्थीतीत **वृक्ष लागवड १५ ऑगस्ट, २०१४ पुर्वी करावी,** जेणेकरुन लागवड केल्यानंतर पडलेल्या पावसाचा रोपास योग्य वाढीकरीता फायदा होईल.

३. लागवड करण्यात येणा–या रोपांची उंची ३५ सें.मी. पेक्षा कमी नसावी.

**आपणास कळविण्यात येते की, आपल्या संस्थेमार्फत वरीलप्रमाणे मुद्दा क्रमांक १ अन्वये खोदलेल्या खडयांचा अहवाल दिनांक ३० मे, २०१४ पुर्वी या कार्यालयास सादर करावा.** सदर उपक्रम हा जनहितार्थ व पर्यावरणाशी संबंधीत असल्यामुळे उपक्रम यशस्वी करण्याकरीता आपण विशेष लक्ष घालून उपक्रम यशस्वी करण्याकरीता सहकार्य करावे.

( गुलाबसिंग ठाकरे )

सहसंचालक,

तंत्रशिक्षण प्रादेशिक कार्यालय, नागपूर

प्रत:– १. मा.जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, नागपूर यांना माहितीस सादर

२. प्रोग्रामर हेच कार्यालय यांना सदर पत्र वेबसाईलवर अपलोड करण्याकरीता